“यज्ञ”

प्रकाशन
७ मे २०१९ वैशाख शुध्द तृतीया
शके १९४१ (अक्षय तृतीया)
चैत्र, वैशाख, जेष्ठ

प्रकाशक
ब्राह्मण सेवा संघ, गोरेगांव.
१०, भीमा चाळ, टोपीवाला वाडी,
स्टेशन रोड, गोरेगांव (प.)
मुंबई - ४०० १०४.

: नोंदणी क्र :
धर्मदाय आयुक्त एफ - ४९३८

प्रमुख संपादक
श्री. प्रकाश गद्रे
कार्यकारी संपादक
श्री. अतुल आरेकर

संपादकीय समिती
श्रीमती सुनेत्रा टिल्लू
श्रीमती नयना भिडे
श्रीमती माणिक जोशी
श्रीमती मीना जोशी
श्री. विलास सोहनी
श्री. मधुसूदन काळे

मुखपृष्ठ
श्री. पुंडलिक वझे

मुद्रक : माऊली सेल्स

देणगी मुल्य रू. ५०/-

Email :
brahmansevasanghgorgaon@gmail.com

बंधुभगिनिंनो, ७ मे २०१९ शके १९४१, अक्षय तृतीया

आपणासमोर “यज्ञ” त्रैमासिकाचा नवीन स्वरुपातला, आगळावेगळा अंक समोर ठेवताना मला मनापासून अतिशय आनंद होतो आहे. “यज्ञ” अंक शके १९३१ या महिन्यात सुरु करण्यात आला. श्री. सतीश रिसबूड हे संपादक म्हणून काम करीत होते. त्यांनी एकखांबी तंबू सारखे अत्यंत मेहनतीने काम करुन हे त्रैमासिक चालू ठेवले होते. मध्यंतरी या अंकाचे प्रकाशन बंद झाले होते. ते पुन्हा कसे सुरु करता येईल याचा संघाच्या कार्यकारिणीने सखोल विचार केला आणि आम्ही सर्वांनी हे शिवधनुष्य उचलण्याचे ठरविले. पाहुया कितपत पेलतय ते.

सर्व रुपरेषा आखली आणि सुमारे ३२ पृष्ठांचे हे “यज्ञ” त्रैमासिक पुन्हा प्रकाशित करण्याचे ठरवले. माझ्या आणि सहकाऱ्यांच्या संपर्कात असलेल्या सर्व कवी, लेखकांशी संपर्क करण्यास सुरुवात केली. मुळात उद्देशच हा होता की, ज्यांच्या साहित्याला सहजासहजी प्रसिद्धी मिळत नाही अशा उदयोन्मुख कवी, लेखकांना संधी देणे. अर्थात काही प्रस्थापितांचे लेखही यात आहेत. सर्व कवी लेखकांनी आमच्या विनंतीला उत्तम प्रतिसाद देवून आपले साहित्य उपलब्ध करुन दिले, त्या सर्वांचे शतश: आभार. एक संपादकीय समितीही आम्ही नेमली. श्रेय नामावलीत त्यांचा उल्लेख आहेच. उपलब्ध जागेत या किंवा पुढील अंकात प्रत्येकाचा एक लेख किंवा कविता छापून येईल याची काळजी घेतली आहे. या पुढेही दर तीन महिन्यांनी “यज्ञ” प्रकाशित होणारच आहे. साहित्य तर हवेच आहे. सर्व जाहिरातदारांचे ही आभार. यापुढेही त्यांच्याकडून असेच सहकार्य लाभो हीच प्रार्थना.

जागे अभावी बरेच लेख, कविता या अंकात छापायच्या राहिल्या आहेत. पुढील अंकात त्यांचा नक्कीच विचार होईल याची खात्री देतो. या सर्व प्रवासात माझे सहकारी कार्यकारी संपादक श्री. अतुल आरेकर यांना विसरुन कसे चालेल? दररोज आम्ही “यज्ञ” मध्येच गुंतलेले होतो. आता पुरे नाही? असेच वर्षानुवर्षे “यज्ञ” त्रैमासिकाला उदंड यश लाभो आणि हा “यज्ञ” उत्तमोत्तम साहित्याने उजळत राहो ही प्रार्थना.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रकाशन समारंभ सुप्रसिध्द अभिनेते मा. **श्री. सुनील बर्वे** यांच्या हस्ते होत आहे. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे.

अंकाचे एकंदरीत स्वरुप व आतील मजकूर आपणास कसा वाटला या बद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया अपेक्षित व स्वागतार्ह आहेत. त्यामुळे पुढील अंक याहून चांगला काढण्यास आम्हाला बळ मिळेल याची खात्री देतो.

या अंकातील लेख, कविता इ. मजकुराची जबाबदारी त्या त्या लेखकांची असेल. संपादक कार्यकारी संपादक वा संपादकीय मंडळ त्यास जबाबदार असणार नाही.

संपादक

“यज्ञ”

अनुक्रमणिका

म्हणे आपण अर्थ साक्षर !

आपल्यावर पिढ्यान पिढ्या साक्षरतेचे संस्कार झाले आहेत. परंतु आर्थिक साक्षरता आपल्या डी. एन. ए. मध्ये आलेलीच नाही. त्यामुळेच मराठी माणसांमध्ये श्रीमंतीबद्दल किंवा श्रीमंताबद्दल विचित्र दृष्टीकोन आढळून येतो. आता पुढची पिढी शिक्षण, नोकरी धंदयानिमित्ताने परदेशी जाऊ लागली आहेत. त्यामुळे हळूहळू हा दृष्टीकोन बदलत चालला आहे. या आर्थिक निरक्षरतेपायी मराठी समाज म्हणून आपल्याला पत नाही.

मी वैयक्तिक आर्थिक पत या बद्दल म्हणत नसून संपूर्ण मराठी समाजाची पत म्हणत आहे. ही पत असेल तर समाजाच्या उन्नतीसाठी किंवा मराठी समाजासाठी खूप काही करता येणे शक्य असते. साधे उदाहरण बघा, आपल्या पु.लं. ना भारतरत्न मिळण्याची योग्यता असूनसुद्दा, ज्ञानपीठ पारितोषिक पण मिळाले नाही. हे आपल्या मराठी समाजाचे दुर्दैव आहे. महाराष्ट्रात ज्यांना पद्मभूषण, पद्मविभूषण देता येईल असे असंख्य समाजसेवक आहेत परंतु त्यांना पद्मश्रीवर समाधान मानावे लागते किंवा पद्मश्रीसुध्दा मिळालेली नाही. याचे कारण आपली दिल्ली लॉबी नाही (पत नाही). आपली जी काही थोडीफार मराठी म्हणून पत असते ती आपण रोजांच्या दिवसांत तोंडात पोळ्या कोंबून घालवून बसतो.

हे सर्व आज आठवण्याचे कारण? पर्युषणकाळांत मांस विक्रीवर घातलेली बंदी. ही बंदी जैन लोकांची "आर्थिक पत" दाखवते. आज महाराष्ट्राची लोकसंख्या जवळपास तेरा कोटी आहे. त्यापैकी एक शतांशसुध्दा जैन नाहीत पण त्यांच्यासाठी पर्युषणकाळात मांस विक्रीवर बंदी. याच्या जवळपासच आपला गणपती उत्सव असतो, आणि बहुसंख्य समाज गौरीला नैवेद्य मासांहारी दाखवत असतो, तरीही बंदी!

आज सर्व पंचतारांकित हॉटेलात जैन पदार्थ मिळतात, पंचतारांकित हॉटेलात भरलेल्या मोठया परिषदात जेवणाची सोय जैन पध्दतीत असतेच असते. समजा नसेल, तर "जैन फूड नही है क्या?" म्हटल्याबरोबर दोन माणसांसाठी सुद्दा जैन जेवणाची सोय केली जाते. हे सर्व त्यांच्या आर्थिक शक्तीमुळे होते. तुमची पुरणाची पोळी कोणत्याही पंचतारांकित हॉटेलमध्ये मिळत नाही.

या आर्थिक सुबत्तेपायी जैन समाजाने स्वत:स अल्पसंख्यांकाचा दर्जा मिळवून घेतला. त्यासाठी त्यांना कसलेही आंदोलन करावे लागले नाही किंवा मोर्चे काढावे लागले नाहीत. काही महिन्यांपूर्वी एका मोठया उदयोगपतीने सांगितले होते की एका राजकीय पक्षाचे दुकान आम्हीच चालवतो. पण वस्तुस्थिती अशी आहे. आज हा जैन समाज सर्वच दुकाने चालवत आहे. हे सर्व तोंड बंद ठेऊन आर्थिक सुबत्तेद्वारे चालू आहे. या उलट आपली आर्थिक सुबत्ता काहीही नाही व वाचाळपणा मात्र चालू आहे. परिणाम चारपैकी तीन दुकानदारांची तोंडे बंद झाली आणि चौथ्यासाठी आता हा विषय संपलेला आहे.

मी ज्यावेळेस समाजाची पत किंवा समाजाची श्रीमंती म्हणतो त्यावेळेस त्या समाजातील प्रतिष्ठित चारशेपाचशे अब्जाधीश डोळ्यांसमोर येतात, जे आपल्या समाजासाठी आपली पत उभी करतात. अशी चार-पाचशे मराठी माणसे संपूर्ण महाराष्ट्रात दिसतात का? मग तुमची दिल्लीत काय तुमच्या राजधानीतसुध्दा पत राहिल का? यासाठी "कानाखाली ची भाषा" उपयोगाची नसते. तर त्यांच्या शस्त्राला (श्रीमंतीला) तुमच्या त्याच शस्त्राने (श्रीमंतीने) उत्तर द्यायचे असते.

जैन समाज म्हटला की आपल्यासमोर फक्त गुजराती समाज येतो, मारवाडी, जैन, संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकात विखुरलेला स्थानिक भाषा आणि आडनावे धारण केलेला जैन समाज आपल्या

डोळ्यासमोर येत नाही. आज मुंबईतील व्यापार प्रामुख्याने जैन समाजाच्या ताब्यात आहे, (व कष्टकरी व्यावसायिक भैय्ये आहेत.) म्हणजे नोकरी करणारे जैन नाहीत असे नाहीत. ते ज्या ठिकाणी आहेत तेथे वरचढच आहेत. वॉरेन बफेचा उत्तराधिकारी जैन आहे तर भारतातला सर्वात श्रीमंत भिकारी भरत जैन आहे. (याच्या नावावर मुंबईत दोन घरे व दोन भाडयाने दिलेली दुकाने आहेत.)

जैन समाजाने मिळवलेली श्रीमंती त्यांच्या क्षेत्रातील ज्ञानामुळे व कष्टामुळे मिळवलेली आहे. मुंबईतील एल अँड टी कंपनीला पूर्वी चेष्टेत लार्सवानी टुब्रमणीयम म्हणत असत. तिथे मराठी टक्का वाढला पण कष्ट करण्याची वृत्ती नसल्याने पवईची मोक्याची जागा सोडून कारखाना केरळ व गुजरात मध्ये हलवणे चालू झाले.

यासाठी उपाय काय? आपल्या पुढच्या पिढ्यांना आर्थिक साक्षर बनवू या. बुध्दिमत्ता व कष्ट याद्वारे आर्थिक सुबत्ता येईल. व ती मराठी समाजाला 'पत' देईल. मुलांना लहानपणापासून आर्थिक शिक्षण दया. आपल्या मागच्या पिढयामधील हा भाग बदलू या. हे आर्थिक शिक्षण कोणत्याही शाळा कॉलेजात मिळत नाही, याचे क्लासेस नाहीत. आपल्या मुलांसाठी तुम्हीच वेळ बाजूला काढा व हे शिक्षण दया.

नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज् मार्केट (सेबीचा एक उपक्रम) मार्फत शाळा कॉलेजमध्ये आर्थिक विषय शिकवण्यासाठी अभ्यासक्रम बनवला आहे. पाचवी/सहावी पासून हा विषय शिकवता येतो. पुस्तके फुकट दिली जातात. शिक्षकांना शिकवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. सेबी, रिझर्व बँक, इर्डा शेअर बाजार सर्वांनी काही हजार कोटी रूपयांची तरतूद यासाठी करून ठेवली आहे. पण शिक्षक हा विषय शिकवण्यास तयार नाहीत. मी काही शाळांमध्ये शिक्षकांजवळ बोललो. चार महिने पगार उशिरा मिळतो, हे नवीन झेंगट आमच्या मागे कशाला? असे उत्तर मिळाले.

म्हणून मी नव्याने आलेल्या आपल्या शिक्षण मंत्र्यांना भेटलो. या विषयाची दोन पुस्तके व पत्र दिले. एक महिन्यानंतचर एका ओळीचे उत्तर आले. "आपला अर्थशिक्षणाबाबतचा विचार अभ्यास समितीसमोर ठेवण्यात येईल. धन्यवाद." म्हणजे महाराष्ट्रात नव्याने १५-२० शेरेगर, शेळ्यामेंढ्या पाळणारे, सागाची झाडे लावणारे येऊन जनतेला फसवत नाहीत तोपर्यंत हा विषय आमच्या अजेंड्यावर नाही. ज्ञानगंगा दारात येवून उभी आहे. त्यासाठी पैसा, शैक्षणिक पुस्तके सर्व तयार आहे पण तिला घरात घ्यायला कोणी तयार नाही. मग यावर उपाय काय? सर्व पालकांनी एकत्र येऊन, पालकसभेमध्ये हा विषय मांडणे गरजेचे आहे. आज आपण मुलांना सर्वप्रकारचे क्लासेस लावतो. शिक्षकाऐवजी आपण हा विषय शिकून घेऊन (ऐच्छिक विषय म्हणून) गटागटाने आपल्या पाल्याच्या वर्गातील सर्व मुलांना रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी शिकवणे गरजेचे आहे. घरातील आजी-आजोबा या उपक्रमात मदत करू शकतात. असे पालक किंवा शाळा तयार झाल्यास त्यांना सर्वप्रकारे मदत करण्यास/ मिळवून देण्यास मी तयार आहे. चला आपल्या पुढच्या पिढीला ही 'पत' येण्यासाठी आजपासून झटूया.

जयंत विद्वांस
९८९२२०२०१९
sebiregisteredadviser@gmail.com

(लेखक सेबीद्वारा नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत.)

क्षण

एक-एक क्षण आपल्या आयुष्यात फार महत्त्वाचे काम करत असतो. एक -एक क्षण आपले आयुष्य बदलत असतो. कधी सकारात्मक तर कधी नकारात्मक ही. दोन्ही गोष्टी आपल्या आयुष्यात कधीही घडू शकतात. अगदी एका क्षणात. आणि मग होत्याच नव्हतं. होतं. हे वाक्याच किती वेगळे आहे. आपला त्या क्षणाकडे बघण्याचा एक नकारात्मक दृष्टीकोन दाखवून देतं. पण खरच तो क्षण घडण्याआधी आपल्या आयुष्यात जे होतं. त्याचा आपल्या आयुष्यावर काही परिणाम होत होता? आणि आता ती गोष्ट नसल्यानेही खरच काही फरक पडतोय? क्षणार्धात होत्याच नव्हत होण्याने आयुष्यात बदल होतो. पण आयुष्य पुढे जाण्याचे थांबत नाही. आपण अडकतो ते त्या क्षणात.

असो, असे अनेक क्षण आपण आपल्या मनात साठवून ठेवतो. काही क्षण तर अगदी घर करूनच राहतात. आणि आठवणीच्या रूपात नेहमीच आपल्या समोर येतात. आणि मग सुरू होतो क्षणांचा खेळ. क्षणात हसू तर क्षणात रडू. या असा एका क्षणांसाठी आपण एक-एक क्षण जगत असतो. आणि क्षणा-क्षणात बदलतही असतो.

एक पाऊल सकारात्मकते कडे टाकताना कोणतीही व्यक्ती क्षणार्धात ते पाऊल उचलू शकत नाही. कारण ती व्यक्ती एक क्षण थांबून विचार करते. आपण टाकलेले पाऊल हे नक्की सकारात्मकते कडेच जात आहे ना? या अशा क्षणी स्वत: वर विश्वास आहे की नाही याची एक परीक्षाच असते. पाऊल टाकले तर परीक्षा पास नाहीतर नापास. पण विश्वास कायमच जिंकतो आणि यश हे मिळतेच.

कोणी म्हणतं, एखादा निर्णय घेताना तो एका क्षणात घेऊ नये. त्या आधी क्षणभर विचार करावा. पण एखादा निर्णय घेण्याची वेळ जेव्हा येते तेव्हा जी परिस्थिती असते ती काही एका क्षणात उद्भवलेली नसते. ती आधीच काही काळ आपल्यासोबत असते. आणि निर्णय घेणे म्हणजे असलेल्या परिस्थितीचे उत्तर. त्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग. मग अशा वेळी आपल्या सोबत असलेली परिस्थिती काय रूप घेत आहे. हे आपल्याला कळतच असते. मग अशा वेळी निर्णय घेऊन मोकळे व्हावे. कारण, ती परिस्थिती एका क्षणाचाही विलंब न करता आपल्या आयुष्यात आलेली असते.

सूर्योदय आणि सूर्यास्त हे एका क्षणात होत असले तरी त्याक्षणाची चाहूल ही आपल्याला आधीपासूनच देत असतात. आणि म्हणूनच तर आपण तो क्षण पाहू शकतो, अनुभवू शकतो. अश्याच काही छोटया-मोठया क्षणामुळे आपले आयुष्य कायमच व्यापलेले असते. कायमचे बदलत असते. आणि एका सकारात्मक वळणावर आलेले असते.

क्षण हा एका मोत्यासारखा असतो. प्रत्येकालाच हवाहवासा असतो. पण फार कमी जणांना तो मिळतो. आणि त्या मोत्याचे असलेले मोलही फार कमी जणांना समजते. पावसाचे अनेक थेंब सागरात मिसळत असतात. पण एकच असा थेंब असतो जो शिंपल्यात जाऊन वसतो. तसेच प्रत्येकाचे जीवन हे क्षणाक्षणांनी भरलेले असते. पण याच क्षणातून आपल्यासाठी अनमोल असलेला क्षण हा आपल्यालाच शोधायचा असतो.

क्षण कठीण असतात पण त्या क्षणातून तावून-सूलाखून बाहेर पडल्यानंतर मिळणारा आनंद हा त्या कठीण क्षणापुढे फिकाच पडतो. तर एक क्षणीक आनंद, दु:ख असते ज्यामुळे आपल्यालाच ठेच लागते. पण असे अनेक क्षण असतात ज्याच्यातून अनेक असे अनुभव मिळतात आणि ते अनुभव मिळवलेले क्षण हा या सगळ्या क्षणांपेक्षा महत्त्वाचा क्षण असतो.

- @वैदेही ओळतीकर
9967819639

With Best Compliments From :

Suhas Paranjpe & Co.

Chartered Accountants

104, Sai Darshan, Plot No. 170, Above NKGSB Bank,
Jawahar Nagar, Goregaon (W.), Mumbai - 400 062.
E-mail : casuhasparanjpe@gmail.com
Tel. : 022-2874 7222

हार्दिक शुभेच्छा !

हरिभक्त **सौ. संध्या रानडे - जोशी**
(संचालिका)
दूरध्वनी : 28726791 मोबा.: 9324436791

अन्नपूर्णा कॅटरर्स

पोळी - भाजी, टिफिन सर्व्हिस, लग्न, मुंज, पार्टी, बारसे, साखरपुडा इत्यादी समारंभाची - फराळ, अल्पोहार व भोजनाची कामे वाजवी दरात घरगुती पद्धतीने स्विकारली जातील.
संपर्क : सकाळी ७ ते ९ व दुपारी २ ते ६

त्रिवेणी सांस्कृतिक मंडळ

श्री. रविंद्र जोशी (गुरुजी)
भ्रमणध्वनी : 8369534405 / 9920024377

तिसरा मजला, ब्लॉक नं. १३, जयकर स्मृती,
आरे मार्ग, गोरेगांव (प.), मुंबई - ४०० ०६२.

With Best Compliments From :

K. M. MARAJ

M. : 9029900896 / 8433617183

Manish Emporium

**Special for : School Book, Stationary,
Toys & Birthday Cards,
Cutlery & Gift Articles,
Office Stationary, Plastic Items,
All Season Items available
Holy, Diwali, Rakhi,
Ganpati & Christmas
Xerox & Printouts.**

4, Kalpana Darshan, L. T. Road 3,
M. G. Road, Goregaon (W.),
Mumbai - 400 062.

"शब्दांनी शब्दांना साथ द्यावी...."

रत्नाचा सकाळीच मोबाईलवर मीस्ड कॉल पाहिला आणि मनातल्या मनात मी समजून गेले, आज बाईसाहेबांच्या गळाला मी लागणार.......! म्हणजे आज तिने मला सकाळीच फोन केलाय याचा अर्थ बाकी सख्यांनी तिची नकारांनी बोळवण केली असणार.

आणि माझा आज विंडो शॉपींगचा जाम मुड होताच!

जमले तर एखादी खरेदी करण्याचा शॉपींग मानसही होताच त्याच मुड मध्ये रत्नाला फोन केला!

"अंजू अगं वीकएन्ड झाला म्हणून काय एवढया उशीरा उठायचं? सुट्टी म्हणजे काय आरामच करायचा का?

"चल थोडी मज्जा करून येऊ सेंटरमॉल ला मस्त सेल लागलाय...!"

"काय म्हणतेस? चल मग मला पण पाडव्याची ओवाळणी मिळालीय...!"

"हं वाटलंच होतं मला म्हणून पहिला फोन तुलाच केला ...!"

मग लेकीला, नवऱ्याला मस्का मारून थोडी प्रायव्हसी, स्पेसच्या गप्पा मारून निघाले ...!

रत्ना अनं मी जाम भटक भटकलो..... मोठ मोठी दुकानांची सुंदर सुबक सिरेमैकची मॉडेल आणि त्यांना घातलेले उंची कपडे ! मनातल्या मनात "स्वत:लापण भारी दिसतील" असं इम्याजीन करून आमची मनाची गाडी तोपर्यंत पुढच्या काचांच्या पल्याडला पोहचलेली असायची...! एक दीड तास विंडो शॉपींग करून आम्ही आलिशान सेंटरमॉलमध्ये शिरलो...!

तिथे मला शॉपच्या काचांच्या आड, खऱ्या खुऱ्या सुंदर सुडौल मुली दिसल्या. उंची कपडे घालून हसून मुरडत होत्या, तसेच पुरूष ही उंची कपडे घालून तसेच रूबाबात हसत होते......! इथे तर सारे अजबच होते! जिवंत माणसे मॉडेल म्हणून काचांच्या कपाटांत उभे करून ग्राहकांना दुकानांमध्ये येण्यासाठी आकर्षीत करत होते! बापरे.... मनात म्हटलं माणूस व्यापारीकरणामुळे कुठे जाऊन पोहचलाय...? ते मॉडेलचे चेहरे वरून हसरे पण आत आत खचलेल्या खाबांसारखे एकटेच, कधीही धाय मोकलून कोसळतील असे वाटले... एकटे... चेहऱ्यावर फक्त हसू... शब्दांना तिथे काही अर्थच नव्हता! काचांच्या आतून कितीही शब्दांना मोकळे केले असते तरी ते काचेला थडकून आतच खाली पडून विरले असते!

ते एकटे तसे शब्दही एकटेच!

"अंजू इकडे बघ..." रत्ना ने हाक मारली, मी भानावर आले! 'ए आपण इकडून या गेट ने जाऊ या'

मी: ओके डीयर! :

तिथे दोन गेट होते..! तिथून पुढे अजून काही पॉश दुकाने होती ! रत्ना पुढे मी तिच्या मागे ....

"हॅलो..!" कुणीतरी मागून हॅलो बोलले होते!

मी मागे वळून पाहिले...! त्या गेटवर एक मुलगी उभी होती... तिनंच मला हॅलो केलं होतं! मी मागे आले, मीही तिला हसून हॅलो केलं! केवढा आनंद झाला तिला ..... तिचा तो आनंद पाहून मला मात्र प्रश्नच पडला!

"काय गं, माझ्या एका हॅलो ने तुला एवढा आनंद झाला?"

"हो मॅम... आज खूप खूप दिवसांनी माझ्या हॅलोला कुणीतरी रिप्लाय दिलाय...!"

ती तसं बोलली आणि मनात चर्रर्रर्रर्र....... झालं!

मी: म्हणजे?

ती: मॅम मी या मॉलच्या गेटवर जॉब करते!

मी: गेटवर ? शिक्षण कमी का?

ती: नाहीं मॅम मी ग्रज्युऐट आहे!

मी: मनातून हबकलेच .... मग गेटवर?

ती: हं फक्त गेटमधून आलेल्या प्रत्येकाला हसून हॅलो करायचे! पगार चांगला आहे. सुट्टी पण मिळते महिन्यातून दोन दिवस!

मी: .... गप्पच

ती: आज किती दिवस मी इथून येणाऱ्याला हॅलो करते पण प्रत्येकजण स्वत:च्याच धुंदीत, कुणाचं माझ्या हॅलोकडे लक्ष तर दूरच पण गेलेच कधी लक्ष तर रिप्लाय तर नाहीच! पण आज तुम्ही मात्र मागे फिरून रिप्लाय दिलात.....

मी: ..... गप्पच! ती आज धबधब्यासारखी बोलत होती..... आणि मी तिच्या फेसाळत्या बोलक्या आनंदाला फक्त न्याहळत होते!

तेवढ्यात माझे दुसऱ्या गेटकडे लक्ष गेले ...! तिथे एक मुलगा असाच हिच्यासारखाच उभा होता! पण तो जरा विचित्र वागत होता! त्याच्या एका हातात आरसा होता आणि त्या आरशात स्वत:चा चेहरा पाहून तोंड वेडवाकडं करून 'हॅलो हॅलो' करत होता!

मी : हे काय करतोय वेडयासारखा? एकटाच काय असा हॅलो हॅलो करतोय?

त्या मुलाचा केवीलवाणा चेहरा पाहून मन गलबललं!

ती : हं तो पण माझ्या सारखाच गेटवर जॉब करतोय!

आजकाल जॉब मिळणं कठीण! तो तर एम.बी.ए. आहे! त्याच्या गेटवर मुळात ये-जा कमी, गेले दोन वर्षे तो तिथे "हॅलो हॅलो" करतोय पण रिप्लाय मिळतोच असं नाही! आणि दोन आठवडयापासून तो एकटाच "हॅलो हॅलो" करतोय... स्वत:ला रमवतोय!

मी: तो मन रमवतोय की एकटेपणाच्या अबोल्यात गुरफटत खोल खोल बुडतोय...... भासांच्या अंधारातून तो रिप्लायचे शब्द शोधतोय.....?

किती किती भयंकर आहे हे सारे...! माझेच शब्द माझ्या घशात अडकल्यासारखे...... आत आत एकदम घुसमट जाणवायला लागली.....! मनातल्या शब्दासकट माझा कोणीतरी गळा दाबतोय असं वाटलं! शब्द अडकले होते......

त्यांना व्यक्त व्हायचे होते....... पण ते एकटेच होते त्यांना रिप्लाय नव्हता...... मग ते पुन्हा आत आत गुरफटून मौनात गेले......!

:

:

:

तुम्ही विचार करीत असाल, असलं कसलं सेंटरमॉल मला कुठे सापडलं? पण मित्र हो हे काल मला पडलेलं स्वप्नच आहे! स्वप्नातलं जग आपल्या वास्तवातल्या जगाची जाणीव करून देतं.!

दोन जीवलग मैत्रीणी काय मित्र काय भेटल्यावर

ज्या आनंदानं उत्साहानं भेटतात, बोलतात तो जो शब्दा शब्दांचा संवाद असतो तो मनामनांचा मोकळ्या आकाशातला एक निश्चित विहार असतो! ज्याने जुन्याच आठवांतून जुन्याच शब्दसोहळयातून नवा आनंद आणि नवी ऊर्जा मिळते!

हो याच नव्या उर्जे साठी, आम्ही सर्वजणी सख्या कॉलेज सोडून वीस बावीस वर्षे झाली त्यानंतर भेटलो प्रथमच भेटलो, ते माझ्या "माझे तुला नि:शब्द शब्द" या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनसोहळ्याच्या निमित्ताने ! तेव्हा केवळ एकमेकींना भेटलो पण दि. २७/१०/२०१७ ला पुन्हा भेटलो. ते मात्र फक्त बोलण्यासठी ......प्रत्येकीला बोलायचं होत! ज्योती तर म्हणाली, "भेटून मोकळ होण महत्त्वाचं!"

खरचं आहे. खूप खूप साचलेलं असतं.... ते जीवाभावाच्या सानिध्यात मोकळं करावसं वाटतं! मोकळ केलं की कसं मन पिसासारखं हलक होतं!

शब्दाला शब्द मिळाला की संवादाची माळ तयार होते ! शब्दांना रिप्लाय मिळाला की आपल्या शब्दांना ही एकटं वाटत नाही...... संवाद बहरतो तो शब्दांना सोबत मिळते तेव्हाच! तोच बहर आम्हा सर्व सख्यांनी किती किती वर्षांनी अनुभवला! आम्ही पुन्हा पुन्हा भेटू मोकळं होण्यासाठी! या दिवशीच हे सारं सारं एका मनाच्या गाठोड्यात बांधून. जीनं तीनं आपआपला आनंदाचा वाटा घेतला आणि घरी गेल्या अगदी पिसासारख्या हलक्या होऊन! पुन्हा भेटायच्या ओढीनं!

तर मित्र मैत्रीणींनो बोलत रहा, शब्दांनी शब्दांना जोडत रहा.... मग तुम्हीही एकटे नाहीत आणि शब्दही!

- पुष्पांजली कर्वे
Mob. : 9892667482
pushpanjali.25karve@gmail.com

शतावरी

घालवते ही पित्त असल्याने तिक्त
दूधाबरोबर शतावरी असल्यास कोणी अशक्त

ही आहे छोटीशी वेल असतात हिला काटे
हिरवी हिरवी काण्डे आणि काण्डांना फाटे

स्त्रियांचं टॉनिक शतावरी कल्प
बहुगुणी असं किंमतीला अल्प

वातावरचं औषध नारायण तेल
त्यातही असते शतावरीचीच वेल

स्निग्ध अशी शतावरी वाढवते रक्तरस
दाह अम्लपित्त दौर्बल्यात उपयोगी स्वरस

थंड अशी पीवरी औषधी हिचं मूळ
वापरा सिद्धघृत झाल्यास कोष्ठशूळ

- डॉ. प्राची म्हसकर
Mob. : 9869425973



आई


तिचे एक सुंदर रूप जशी तेवती पणती
मिणमिणते दारात उजळते परिसर
तिच एक लोभस रूप जशी दरवळे उदबत्ती
झिजते कणाकणाने सुगंधित करी घरदार
तिच एक साजिररूप कधी भासे नंदादीप
सदा निरपेक्ष वृत्तीने उजळविते देव्हारा
तिच एक रूप कधी होई झाशीची राणी
दहा हातांनी अन्यायाशी झुंजताना होते साक्षात रणरागिणी
प्रत्यक्षात ती आहे माझी आई
सर्वांसाठी सदोदित तेवणारी समई

- कवयित्री सुधा मधुसूदन जोशी
9833252718

ही वाट चालताना

श्रृंगारिल्या जगाची ही वाट चालताना
मोहात गुंतलो मी, कळुनीच ना कळेना
हा भास जीवनाचा, स्वप्नातल्या सुखाचा
सारे क्षणिक आहे, उमजुनी ना कळेना
सुख -दु:ख भोग सारे, हा खेळ या मनाचा
ही जाण अंतरीची, माझी मला कळेना
कां घेऊ मी उशाला, हा भार वेदनांचा
मग एक जीवनाचा, स्थिर मार्ग तो कळेना
ही आगळीच दुनिया, आभास जीवनाचा
किमया कशी प्रभूची, शब्दांस साहवेना
धागा कधी सुखाचा, शोधुनी शोधवेना
ही कोंदणे मनाची, खुलता कळी खुलेना
अबोल बोल होता, नि:शब्द जगताना,
श्रृंगारिल्या जगाची, ही वाट चालताना,

- कवी देवदत्त रामचंद्र जोशी
मो. नं.: ९१६७०३३४४६



सणांचे ऋण

चैत्र महिन्यात गुढीपाडव्याला गुढी उभारुन अनेक सणांची जणू "गुढी" उभारली जाते. झाडांना फुटलेली पालवी, बहरलेल्या कळ्या, आंब्यांचा मोहोर, कोकिळेचे कुंजन... सारेच वसंताच्या आगमनाचे स्वागत करत असतात. वेगवेगळ्या ऋतुंना शोभीवंत करणारे विविध सण मानवी जीवन अर्थपूर्ण व रंगीन करतांना दिसतात. गुढीपाडव्याने नववर्षाची आशादायी सुरुवात होऊन मग रामनवमी, हनुमान जयंती, चैत्रगौरी करत-करत गणपती येऊन ठेपतात. दसरा पटकन सरतो आणि दिवाळीची लगबग सुरू होते. थोडी उसंत घ्यावी तोच तीळाचे महत्त्व सांगणारी मकर संक्रांत येते... आणि बघता बघता होळीने सांगता होऊन परत नवीन रंग लेऊन रंगपंचमी पुढील वर्षातील सणांसाठी सज्ज होते.

बरं! या सणांपाठीमागचे दृष्टीकोनही किती महान! निसर्गाबद्दल वाटणाऱ्या आदरभावातून गंगापूजन, वटपौर्णिमा, कोजागिरी. पक्षी-प्राणी यांच्या प्रेमभावनेतून - कोकीळाव्रत, नागपंचमी, बैलपोळा. मूर्तीपूजेतून रामनवमी, हनुमान जयंती. व्यक्तीपूजेतून - गांधीजयंती, शिवजयंती. कौटुंबिक बंधनासाठी - राखीपौर्णिमा, भाऊबीज. खास स्त्रीयांसाठी - हरतालिका, मंगळागौर. सामाजिक व सार्वजनिक एकतेसाठी - सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी.

धार्मिक ऋजुवात करणारे हे सण नकळत आपणास संदेशही देऊन जातात. निश्चयाचा मंत्र देणारा गुढीपाडवा, दानाचे महत्व सांगणारी अक्षयतृतीया, सागराचे ऋण मानणारी नारळीपौर्णिमा, धान्य निर्मितीचा आनंद व्यक्त करणारा दसरा. ऋषी-गुरुंचे श्रेष्ठत्व मनी जपणारी ऋषीपंचमी - गुरुपौर्णिमा, 'प्रकाशाकडे चला' संदेश देणारी दिवाळी.

गोड बोलण्याचा कानमंत्र सांगणारी मकरसंक्रांत, मानवी दोष व विकृतीचे दहन करणारी होळी आणि 'रंगूनी रंगात माझ्या' असा नवा उत्साह व चैतन्य देणारी रंगपंचमी. सारेच लाघवी, अर्थपूर्ण व साजरे असे हे सण.

सणांच्या निमित्याने अनेकांना वेगवेगळी संधी प्राप्त होते. पारंपरिक काळात 'चूल-मूल' इतकच कार्यक्षेत्र असणाऱ्या स्त्रीला सणांच्या निमित्याने उंबरठा ओलांडता येत असे. दागदागिने घालून नटून-थटून वडाला फेऱ्या मारता-मारता मैत्रीणींसवे ती बंधमुक्त होत असे. चैत्रगौरीत डाळ-पन्ह्याचा आस्वाद घेत ती हास्य-विनोद करू शकत असे. सणांमुळे अनेक कलांना-कौशल्यांना प्रोत्साहन मिळे व आजही मिळतं. चित्रकला, मूर्तीकला, रांगोळी, संगीत, नृत्य, नाट्य, वत्कृत्व, अभिनय - आजही ग्रामीण भागात भजन, कीर्तन, दशावतार, विविध पारंपारिक नृत्य इत्यादी कार्यक्रम दिसून येतात. सणांच्या निमित्याने भरलेले मेळे-जत्रा यांची गंमत तर काही औरच असते. शहरातील कितीतरी मंडळी रजा काढून आपल्या कुटुंबासह गावी जाऊन याचा आस्वाद घेतांना दिसतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सणांमुळे खाद्यसंस्कृती बहरात येते. वेगवेगळ्या सणांना वेगवेगळे गोड पदार्थ केले जातात. खीर, मोदक, बासुंदी, श्रीखंड, गुळपोळी, पुरणपोळी, साखरभात, किती नावे घ्यावीत! सुगरणींना आपले पाककौशल्य दाखवण्याची व नवीन पिढीला हे पदार्थ शिकण्याची संधी मिळते. गणपतीला पंक्तीमध्ये केळीच्या पानावर विराजमान झालेले - ताजे कैरीचे लोणचे, चटणी, पंचामृत, सांडगे-पापड, अळूवड्या, मटकीची उसळ, वरण-भात, मसालेभात आणि गरमागरम मोदक व त्यावर पडणारी तूपाची धार - अहाऽहा! त्या आस्वादावर व आठवणींवर पुढील

वर्ष सहज जगता येते. आजच्या तरूण मुलींनी... मुलांनीही चालेल... हे आजचे ‘चामट-पिझ्झे’ व ‘वातड-मोमोज’ चघळण्यापेक्षा मऊसूत पुरणपोळ्या व कळीदार मोदक जरूर जरूर शिकून घ्यावेत व आपल्या रूचकर खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेण्याची संधी दवडू नये.

आधुनिक युग हे संगणक युग आहे तसेच ते प्रसार माध्यमाचे व मार्केटिंगचेही युग आहे. सणांच्या निमित्याने व्यवसायिकांना खूप मोठी संधी मिळत असते. फुले-हार विक्रेते, पुरोहित, मंडपवाले, इलेक्ट्रीशन, डेकोरेटर्स... इथपासून ते अगदी सराफांच्या दुकानापर्यंत विविध आर्थिक व्यवहार होत असतात. प्रत्येक व्यवसायिकाचे ‘नफ्याचे’ पारडे जड होते. ही गोष्ट तशी सकारात्मकच आहे परंतू परदेशी मंडळींनी भारतीय मार्केट ताब्यात घेऊ नये याची दक्षता मात्र आपण साऱ्यांनीच घ्यायला हवी.

सण साजरे करतांना काही पत्थ्येही पाळायची असतात. सणांचे पावित्र राखले जाईल, धार्मिक सलोखा निर्माण होईल, स्वच्छता राखली जाईल, ध्वनीप्रदुषण होणार नाही, अंधश्रद्धा बळावणार नाहीत, विघातक कृत्य घडणार नाहीत. समाज प्रबोधन होऊन समाज उपयोगी कार्य घडतील असे प्रयत्न जाणिवपूर्वक व्हायला हवेत.

आज आपण पाहतो प्रत्येक व्यक्ती-कुटुंब-समाज साऱ्यांनाच अनेक ताण-तणाव, अडचणी, विवंचना यांना सामोरे जावे लागत असते. मानसिक मरगळ मोठ्या प्रमाणात येत असते. अशावेळी सणांच्या रुपाने येणारे हे ‘छोटे-छोटे-ब्रेक’ खरच खूप सुखद शिडकावा करणारे ठरतात. काही काळ का होईना आपण आपले प्रश्न दूर सारू शकतो किंवा या निमित्याने ते सोडवू ही शकतो. म्हणून खूप काही देऊ करणाऱ्या या सणांकडून आपण चैतन्य व उर्जा घेऊन आपल्या जीवनाला आनंदमयी करायला हवे. या सणांचे ऋण मान्य करून गुणगुणायला हवे...

‘मला सांगा ‘सुख’ म्हणजे नक्की काय असतं?
काय पुण्य असलं की जे घरबसल्या मिळतं...
घरबसल्या मिळतं...’

- सुनेत्रा टिल्लू
फोन: ९३२३७९३९९५

।। चैत्रांगण ।।

मला चैत्रांगण काढायला सांगून
निघुन गेलीस कां ग?
तुला वरून खुणावत
होत का ग तारांगण?
म्हणून भरभरून बोललीस
चित्रांगणाबद्दल शेवटचं
तुला दिल होत देवानं
रसिकतेच वरदान
म्हणूनच किती किती
दिलेस मला आनंदाचे क्षण
त्याक्षणांनी सजवून
टाकलेस माझे जीवनांगण
प्रार्थनेने दिले होते
तुला मला जीवनदान
मग का ग गेलीस?
अशी सगळं टाकून
बरं नाही अस अवेळी जाणं
त्यामुळ बाबांच गहिवरले गाणं
ओंकार मेतदची साद
घालतोय आम्ही सर्वजण
वाट पाहतेय तुझी
माझं चैत्रांगण
माझं चैत्रांगण.

(डॉ. सौ. शिल्पा जोशी)
मोबा.: ९९६७७०८४७४



सुख

सुख म्हणजे नक्की काय असत? हातीपायी धड आहोत, डोकं जागेवर आहे व दोन वेळेला दोन घास मिळतायत म्हणजे सुखं. डोक्यात कुठलेच विचार मग ते सुविचार असो की अविचार न येणे म्हणजे सुख. हे अनाठायी विचारच आपलं सुख हिरावून घेतात. लहान मुलं म्हणूनच सुखी असतात. त्यांना ना भय ना भीती. आपणच आपल्या गरजा वाढवून घेतो आणि त्या पूर्ण करता करता सुखापासून वंचित होतो.

म्हातारपणी सगळ्यात मोठं सुख कुठलं असेल? कामधंदयावर जाण्याचं झंझट नाही, हे कोणी म्हातारपणाचं सुख म्हणून सांगेल. खंरआहे, पण आयुष्यभर केलेल्या नोकरीत जे काय देहाचं चिपाड व मेंदूच दही झालेलं असतं त्यानंतर घरी बसण्यातलं सुख उपभोगण्यातील क्षमता संपलेली असते.

माझंच उदाहरण घ्या. माझी साठी ओलांडली म्हणजे नक्की काय झाल? मी रेल्वे व एस.टी. तील सवलतींना पात्र झालो. आता ट्रेनमध्ये खालचा बर्थ मिळेल. बसमध्ये पुढून चढू शकतो. 'आमच्या काळी बरं का' असं म्हणण्याचा लोकाधिकार मला प्राप्त होतो. तरूण मुली माझ्याकडे, 'आता अगदीच सेफ' या नजरेनं बघू लागतील. केवळ वयाचा आकडा विचारात घेऊन प्राप्त होतो तो ज्येष्ठ नागरीक म्हणून गौरव आमच्या वाडीत होईल. सत्कारात मिळालेली शाल तिथेच विकली आणि नारळ हलवून आत पाणी आहे का पाहिलं तर 'साठी बुद्धि नाठी' म्हणून समाज माझ्या मर्कटलीलांकडे क्षमाशीलपणे पाहिलं. साठ वर्षाचा होण्यासाठी विशेष काही करावं लागत नाही. फक्त एकदाही न मरता जिवंत राहिलं की झालं.

मग म्हातारपणी सगळ्यात मोठं सुख कुठलं?

कुठलेही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागत नाहीत हे ते सुख असू शकेल का? घ्यावे लागत नाहीत हे अर्धसत्य झालं, घेऊ दिले जात नाहीत हे पुर्णसत्य आहे. आपण आंघोळीला केव्हा जावं, किती वाजता जेवावं, पेपर केंव्हा वाचावेत, फोनवर किती बोलावं, आपली नेमलेली कामं विसरून चालेल का हे व यांसारखे सर्व निर्णय आपल्यासाठी दुसरेच घेत असतात.

मग म्हातारपणी सगळ्यात मोठं सुख कुठलं असेल?

तरूणपणीच देवानं उचलून नेलं नाही की आता फार थोडे दिवस या शापित आयुष्याचे उरलेत हे?.....

- **प्रदीप दाते,** गोरेगांव
Mob. : 9619201706



ब्राह्मण सेवा संघ - गोरेगांव स्थापना १९७८

ब्राह्मण सेवा संघाविषयी आणि गेल्या दहा वर्षात केलेल्या उपक्रमाविषयी थोडे नमूद करणे आवश्यक आहे. संघाचे सध्या सुमारे ५०० आजीव सभासद आहेत. धार्मिक, सांस्कृतिक, वैचारिक, आरोग्य, करमणूक, वधुवर केंद्र, संम्मेलन असे विविध उपक्रम आम्ही करत आहोत.

धार्मिक :
किर्तने,
गणेशयाग,
दत्तयाग,
पुरुषोत्तमयाग,
नक्षत्रपूजन.

यज्ञ :
त्रैमासिक
अध्यात्मीक,
प्रबोधनात्मक,
प्रवास वर्णन,
साहित्य, इ.

आरोग्य :
osteporosis
Detection Camp.
किलेशन थेरपी
BP ECG - साई स्पर्श.
डॉ. तुमच्या दारी (मधुमेह)

वैचारिक प्रबोधन / मनोरंजन
वाचन कशासाठी - अनुराधा गोखले
उदयोन्मुख महिला व्यावसायीकांचा मेळावा
रामरक्षा-विश्लेक्षण
अंटार्क्टीका - एक विलक्षण अनुभव
(डॉ. मधुबाला चिंचाळकर)
टि. व्ही. मालिका-मनोरंजन-सवय-की?
(श्रीम. अरूणा जोगळेकर)
आकाश दर्शन - पराग लिमये.
स्त्री विविधता - स्मिता आपटे
अरेप्रश्न-अरेप्रश्न-प्रश्न प्रश्न अरे अरे -
शिबानी जोशी-श्री. अनिल हर्डीकर
गीत रामायण :
वारी विठ्ठलाची-अभंगवाणी
पडसरे येथे एक दिवसीय सहल
(भेट आदिवासी शाळा)
ये रे घना-पाऊस गाणी, दिपसंध्या
(अनेक उदयोन्मुख कलाकारांना
आपली कला सादर करण्याची
संधी यातून मिळाली)

सांस्कृतिक :
तीळगुळ समारंभ,
वासंतीक उत्सव,
अभिनय स्पर्धा,
दिवाळी पहाट,
धुंधुरमास,
क्ले मॉडेलींग } मुलांसाठी
क्राफ्ट मेकींग } मुलांसाठी

वधुवर सूचक मंडळ :
आठवड्यातून दोन दिवस
नावे नोंदणी.
गोरेगांव-अंधेरी शाखा
वधुवर मेळावा,
विवाहेच्छुक मुलामुलींचे
स्नेह सम्मेलन.
वधुवर पालक मेळावा
(तयारी सहजीवनाची)
वेबसाईट -
www.lagnakara.com

स्नेह सम्मेलन :
संगीत, नृत्य, नाट्य, प्रहसन असे विविध कार्यक्रम यात सामाविष्ट होते.

वरील सर्व उपक्रमात सुधीर गाडगीळ, द्वारकानाथ संझगीरी, विश्वनाथ पेठे अशा मान्यवरांचे, सभासदांचे, वक्त्यांचे आणि आपणा सर्वांचा सहभाग होता. त्या त्या वर्षाची कार्यकारीणी या साठी कार्यरत असते. विविध कार्यक्रमांची बोलकी छायाचित्रे सोबत छापली आहेत.

इतकी वर्षे कार्यरत असून अजूनही संस्थेकडे स्वत:ची वास्तु नाही याची खंत आहेच. यासाठी आजच प्रयत्न सुरु करण्याचा संकल्प आम्ही करीत आहोत. आपण सर्वजण निश्चित आर्थिक हातभार लावाल याची खात्री आहे.

धन्यवाद !

कार्यवाह
ब्राह्मण सेवा संघ

अध्यक्ष
ब्राह्मण सेवा संघ

आवड, अभ्यास आणि उमेदवारी

दहावी, बारावी पर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर, व्यावसायिक शिक्षणात, व्यावसायिक शिक्षण घेण्याच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. संबंधित विषयाचे अभ्यासक्रम पूर्ण करून घेणाऱ्या शैक्षणिक संस्थाही निघाल्या आहेत.

ज्या व्यवसाय-विषयाची आपल्याला मनापासून आवड आहे असा अभ्यासक्रम निवडल्यास निश्चितच फायदा होतो. कारण त्या विषयाची आवड असल्याने त्यात आपण मनापासून रस घेतो. त्यात आपण रमतो, महत्त्वाचे म्हणजे कोणीतरी आपल्यावर तो विषय घेण्यासाठी जबरदस्ती केलेली नसते. त्यामुळे असे शिक्षण घेण्यात आपल्याला निश्चितच आनंद मिळतो. पण...

जेव्हा एखादया विषयाचा अभ्यासक्रम तयार केला जातो, तेव्हा त्या विषया संबंधित सर्व पैलुंचा विचार केला जातो आणि त्याबर हुकूम अभ्यासक्रम तयार करण्यात येतो. त्यावर प्रश्न तयार करून परीक्षा घेतली जाते. कारण "तो विषय-अभ्यासक्रम विद्यार्थ्याने किती आत्मसात केला आहे", ते समजून घ्यायचे असेल तर त्या विषयाची परीक्षा घेणे हाच एक उपाय आहे.

परीक्षा म्हटले की त्यात उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण होणे आलेच. एखादया विषयाची आवड असणे आणि त्याचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पार पाडणे हया दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

ज्या मुलांना अभ्यासाचा मुळातच कंटाळा किंवा नावड आहे. अशा विद्यार्थ्यांना कुठलाही अभ्यासक्रम पूर्ण करण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्या व्यवसाय-विषयाचे पध्दतशीर शिक्षण घ्यायचे आहे, आणि त्याच्या परिक्षेत उत्तीर्ण व्हायचे आहे. त्या विषयाचा अभ्यासही मनापासून करावा लागतो. हे लक्षात ठेवावे.

काही व्यवसाय अत्यंत आकर्षक आहेत. त्या व्यवसायात लोक उत्तम पैसा कमवितात, एक प्रकारचे आकर्षण असते. तरूणांना, असे व्यवसाय निवडावे असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु ह्या व्यवसायात "घी देखा लेकिन बडगा नही देखा" अशी अवस्थाही होऊ शकते. कारण असे व्यवसाय यशस्वी करण्यासाठी कुठलेही कारण न सांगता, वैयक्तिक, कौटुंबिक कारणे, पूर्ण बाजूला ठेऊन, पूर्णपणे झोकून देऊन अहोरात्र, काम करावे लागते. ते तुमच्या शारीरिक क्षमतेची पुरेपूर परीक्षा पहाणारे व्यवसाय असतात, अशा व्यवसायात दररोज नवीन कल्पना आणि तंत्रज्ञान विकसित होत असते. त्यामुळे अत्यंत सतर्क आणि अद्यावत रहाणे आवश्यक असते. हया सगळ्या वास्तवाचे पूर्ण भान विद्यार्थ्याला असलेच पाहिजे.


विद्यार्थ्यांनी त्यांना आवडेल त्या व्यवसायाचे, व्यावसायिक शिक्षण घेण्याबरोबरच त्या व्यवसायात पहिली काही वर्षे कुठल्याही आर्थिक मिळकतीची अपेक्षा न ठेवता, संबंधित व्यवसायात उमेदवारी केलीच पाहिजे. कारण कुठल्याही व्यवसायात यशस्वी होण्यासाठी पुस्तकी ज्ञाना बरोबरच, प्रत्यक्ष काम करत घेतलेले व्यवसायिक ज्ञान उपयुक्त ठरते. यशस्वी उद्योजक होण्यासाठी ती "पूर्व अट असते." असे पक्के समजावे.

आवडीच्या विषयाचा अभ्यासक्रम निवडण्यापूर्वी वरील गोष्टीचे भान असावे. परंतु भांबावून जायचे कारण नाही. तरूण वयात हे अजिबात कठीण नाही. हे आव्हान जरूर स्वीकारा. नोकरी करणाऱ्या पेक्षा नोकऱ्या देणारे व्हा.

- मोहन गद्रे
gadrekaka@gmail.com
९८६९९६६९३६

रंग हा नारिंगी

रंग हा नारिंगी,
स्वार इंद्रधनुवरी दुसऱ्या स्थानी.



कधी हा दिसतो गुलमोहरात व घाणेरीच्या फुलात,
तर कधी दिसतो शरद ऋतुतील मेपलच्या पानात.

कधी हा दिसला मारूतीरायाने लावलेल्या शेंदुरात,
तर कधी हिंदुत्त्वाच्या भगव्या झेंड्यात.

बाळगोपाळ यांस चट करती (रसना) खेळ खेळता दमलो म्हणुनी,
तरुणाई व वयस्क ढोसती (नारिंगी) वेगवेगळे बहाणे करूनी.

कधी हा दिसतो राख होणाऱ्या निखाऱ्यात,
तर कधी दिसतो चेतना जागविणाऱ्या ठिणगीत.

कधी सर्वकाही भस्मसात करणाऱ्या आगीत,
तर कधी मनाला उभारी देणाऱ्या, देवासमोरील निरांजनाच्या ज्योतीत.


रंग एक पण त्याची नावे-रुपे अनेक,
माणसांनी आपल्या परीने काढले त्याचे अर्थ अनेक.

मला मात्र भावला तो सूर्योदयातील केशरी झळाळीत,
काळोखाला भेदून येणाऱ्या प्रफुल्लीत दिवसाच्या नव्या नवलाईत.

- नंदिता मेहंदळे,
फोन : ८८५०५७७१७७

ए.टी.के.टी.

जीवनाच्या परीक्षेत कॉपी
करायला चान्सच नाही.
कारण अगदी सेम पेपर असणारा
दुसरा कोणी विदयार्थीच नाही
प्रत्येकाचा पेपर वेगळा
प्रत्येकाचे उत्तर वेगळे
पण एकच परीक्षक येथे
तपासत असतो पेपर सगळे
कुणाला मिळत डिस्टिंगशन तर
कुणाला फर्स्ट क्लास
कुणी मिळवी गोल्ड मेडल तर कुणी नुसताच पास
पण फेल झाल्यावर मात्र येथे
ATKT मिळत नाही.
कारण पुन्हा परीक्षा देण्याची येथे
सोयच नाही.



- सौ. शुभदा वैशंपायन
Mob. : 9869530597

कारगिलचा शिलेदार

१९६५ चा काळ चीनने भारताशी युद्ध सुरु केले होते. कारगिलमध्ये आपले जवान प्राणपणाने लढत होते. कारगिल हा हिमालयातील युद्धासाठी वापरण्यात येणारा तळ. तेथे वारंवार हिमकडे कोसळत होते. हिमवादळे होत होती. काही जवान कड्याखाली गाडले गेले. तेथील एका चौकीवर मेजर मिल्खासिंग जवानांना सुचना देत होते. जवानही त्यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानत होते. एवढ्यात चीनी सौनिकांनी त्या चौकीवर तोफा व बंदुकांचा जोरदार मारा सुरु केला. बरेचजण घायाळ झाले. एवढ्यात दोन तीन गोळ्या मेजर मिल्खासिंगला लागल्या. त्यातील रामसिंग हा जवान लढत होता. त्याने मेजरसाहेबांना खाली पडताना पाहिले. तो धावत मेजर साहेबांकडे धावत आला - 'मेजरसाहेब आप ठीक तो हो ना?' त्यांच्याकडून प्रत्युत्तर आले नाही. त्याने मेजरसाहेबांच्या तोंडावर पाणी शिंपडले. तेव्हा ते थोडे शुद्धीवर आले. रामसिंगने विचार केला, "आपल्या मेजरना काही होता कामा नये." नाहीतर आपल्याला लढायच्या सूचना कोण देणार? "बाकीचे कोणी गेले तरी चालेल पण मेजरसाहेब हवे आहेत, त्यांना वाचवलंच पहिजे", असे म्हणून मेजरना पाठीवर घेऊन रामसिंग खालच्या चौकीवर निघाला. तो बर्फाच्छादीत कडा, पाठीवर एवढं वजन घेऊन उतरताना रामसिंगचे पाय घसरु लागले. मग तो खाली बसला. पाय लांब करून मेजरसाहेबांना पायावर झोपवले आणि स्वत:ला त्या कड्यावरून झोकून दिलं. बऱ्यापैकी उतार असल्यामुळे रामसिंग खाली घसरत येऊ शकला, तेथेच एक मोठा खडक होता. त्याच्याजवळच एक झुडूप होते. रामसिंगने विचार केला की मेजरना आपण येथे ठेवलं तर शत्रूला ते दिसणार नाहीत. थोडा आराम झाला की मेजर चांगले होतील. मग खालच्या चौकीवर त्यांना नेणे सोपे जाईल. त्या खडकाला टेकवून मेजर साहेबांना बसवलं आणि रामसिंगने त्यांच्याशी बोलायला सुरुवात केली. थोडा वेळ त्यांची हालचाल झाली. पण काही मिनिटातच सगळं शांत झालं. रामसिंगने त्यांना गदागदा हलवून पाहिलं. मग तो समजला, "मेजरसाहेब आपल्याबरोबर नाहीत." एवढा पहाडी छातीचा रामसिंग एकदम हेलावला - 'मेजरसाहेब' म्हणून त्याने हंबरडा फोडला. त्यांना कवटाळले. त्याने क्षणभर विचार केला. आता त्यांच्याजवळ थांबून उपयोग नाही. खालच्या चौकीवरच्या मेजरला हे सांगायला हवे. त्यांच्या हाताचं घड्याळ काढून ते आपल्या खिशात ठेवलं. त्यांना सलाम केला. खूप रडला, समरभूमीवर हे सैनिकच एकमेकांचे नातेवाईक असतात. सुखदु:ख एकमेकाशी वाटून घेतात. म्हणूनच त्याला मेजरसाहेबांचं प्रेम वाटत होतं. "माझा मोठा भाऊ आज मला सोडून गेला." असं म्हणून डोळे पुसत तो खाली उतरु लागला. तोपर्यंत चीनने भारताचा भाग जिंकला होता आणि त्याच भागात रामसिंग एकटा येत होता. एवढ्यात चीनचे ८/१० सैनिक तेथे आले. त्यांनी रामसिंगला पकडून आपल्या चौकीवर नेले. त्याला दोन तीन गोळ्या घातल्या. उजवा हात व उजवा पाय निकामी केला. तो जमिनीवर पडला. दोन सैनिकांनी त्याला बुटाच्या लाथा घातल्या. 'बोलो, तेरा नाम क्या है?' 'मैं इंडियन जवान हू।' ह्यापलीकडे त्याने काहीच सांगितले नाही. त्याचं तोंड त्या सैनिकाने दाबून धरलं व सांगितले, 'बताओ तेरा नाम।' त्याने शेवटपर्यंत सांगितले नाही. मग ते सैनिक त्याच्या तोंडात बिस्किटे कोंबायला लागले, ती बिस्किटे त्याने थुंकून टाकली. दारु ओतायला लागले तीही त्याने चूळ भरून टाकून दिली. रामसिंग मार खाऊन, गोळ्या

खाऊन थकला होता, त्याला ग्लानी आली.

एवढ्यात चीनी मेजर त्याच्या सैनिकांना म्हणाला, 'अभी वह उठेगा नही। मर जायेगा, उसके पीछे मत पडो। हम अभी बडी पार्टी करेंगे। इंडियाका इतना मुलुख जीता है। चलो खुशिया मनायेंगे।'

सगळे सैनिक भरपूर दारु पिवून, खाऊन नाचू लागले. बायका आणल्या होत्या त्या नाचून गाऊन त्यांची करमणूक करीत होत्या. काही वेळाने अती मद्य पानाने सगळे झिंगून पडले. एवढ्यात थोडी विश्रांती मिळाल्याने रामसिंग शुद्धीवर आला. एवढी सामसूम पाहून तो खुश झाला. चांगला मौका मिळालाय येथून सटकण्याचा. त्याने उठण्याचा प्रयत्न केला. पण पायातून तीव्र वेदना निघाली. मग तो घसपटत त्या तंबूच्या बाहेर पडला. आजुबाजूचा कानोसा घेत तो मेन रोडजवळ आला. एवढ्यात त्याला चीनी सैनिकांची जीप येताना दिसली. तो पटकन एका झुडुपात लपला. जीप दूर गेल्यावर पुन्हा घसपटत पुढच्या मार्गाला लागला. थोडा पुढे आल्यावर त्याला एक भला मोठा मेंढ्याचा कळप दिसला. त्याचवेळी चीनी जीपही त्या भागात आली. त्यांनी रामसिंगला पाहिलं. लगेच एका सैनिकाने चीनी चौकीवर फोन केला की एक इंडियन जवान येथे आहे. त्याला पकडायला मदतगार पाठवा. दोन जीप्स भरून चीनी सैनिक आले आणि आजूबाजूला शोधायला सुरुवात केली. रामसिंगने शक्कल लढवली. तो मेंढ्यांच्या कळपात शिरला व मेंढ्याबरोबर रांगू लागला. त्यामुळे एवढ्या मोठ्या कळपात तो झाकला गेला. चीनी सैनिकांना, "भारतीय जवान मिळाला नाही" म्हणून ते हात हालवत निघून गेले. सारं शांत झाल्यावर रामसिंग एक दोन मैल गेल्यावर त्याला भारताची सीमा दिसली आणि तो आनंदाने नाचू लागला. क्षणभर आपल्या जखमांच्या वेदना विसरला. पण एक हात व एक पाय कामातून गेल्यामुळे तारेच्या काटेरी कंपाऊंडपलिकडे जायचं कसं हा मोठा प्रश्ना होता. त्याने कमरेचा पट्टा एका हाताने काढला तो तारेभोवती एका हाताने गुंडाळून एक टोक तोंडात धरून गाठ मारली. त्या तारांखालून सरपटत पलिकडे येण्याचा प्रयत्न केला. पण त्या जखमी पायाला अन् हाताला तारांचे काटे टोचलेच. एक जोरदार सणक त्याच्या सर्वांगातून विजेसारखी लखकन गेली. तो जोरात ओरडला. पण भारताच्या हद्दीत आला. त्यावेळी त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. त्या जोशाच्या भरात तो उभा राहिला. हसत, नाचत, एका पायावर उड्या मारत तो मुख्य चौकीवर पोहोचला. त्यापूर्वी चीनची हद्द ओलांडून भारतात आल्यावर "आपली माती" स्वत:च्या कपाळाला लावली व चीनच्या दिशेने धूळ फेकून तुमच्या देशाला आम्ही 'धूळ चारु' असे म्हणाला.

चौकीत गेल्यावर मात्र त्याच्या अश्रुंचा बांध फुटला. ओक्साबोक्शी रडत तो मेजरजवळ गेला व म्हणाला, "साहेब, मी मेजरना नाही वाचवू शकलो. त्यांची निशाणी म्हणून मी त्यांचं घड्याळ आणलंय." मेजरना कुठे ठेवलंय हे सांगितलं. त्याच ठिकाणी मेजरचं स्मारक बांधलं. रामसिंगला हॉस्पिटलमध्ये ठेवून व्यवस्थित निगराणी दिली. तेथेच त्याचा कारगील युद्धातला मित्र महेंद्रसिंग त्याला भेटायला आला. रामसिंगची अवस्था पाहून तोही खूप रडला. त्या मित्राच्या हाताच्या दोन्ही कोपरातून गोळ्या जाऊन भोके पडली होती. हे दोघेही मित्र आपल्या मेजरच्या स्मारकाला कारगिल युद्धाच्या दिवशी भेट देऊन मानवंदना देतात.

- उषा देव

मो.: ९९८७९२७२४७

With Best Compliments From :

WAMAN HARI PETHE JEWELLERS

PURE TRUST SINCE 1909

Bldg. No. 5, Mitha Nagar, Shree Chintamani Co-op. Hsg. Society Ltd.,
M. G. Road, Goregaon (W), Mumbai - 400 104.
Tel. : 28710107 / 08 / 09
Email : goregaon@whp.co.in
Website : www.whpjewellers.com

हार्दिक शुभेच्छा !

।। श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये ।।



फोन : 022 28743510

मोबा. : 9820849179



राजेश पंडित

पुरणपोळी, फराळ, मसाले भात, अल्पोपहाराच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.

बेलवलकर वाडी, महात्मा गांधी रोड, गोरेगांव (प.), मुंबई - ४०० ०६२.

अरे चाचणी... चाचणी...

अरे चाचणी... चाचणी...

मला अगदी ठळकपणे आठवते, की इ. चौथीत इतिहासाच्या चाचणीत जोडया लावा प्रश्न होता.

अ गटात... घटना... शिवाजी जन्म, राज्याभिषेक, अफझलखान वध, शाहिस्तेखानशी चकमक वगैरे... वगैरे....

आणि ... ब गटात ..... सनावळी!

माझा जाम गोंधळ उडाला. हातापायांची चाळवाचाळव, पेन्सिल ची टकटक, डोके खाजवणे, आढयाकडे बघणे... पण तो 'लक्ष्या' प्रसन्नच होईना.... मग.... बाईंचा कोणा डोळा चुकवून, तिकडच्या कोपऱ्यात शेवटच्या बाकावर बसलेल्या मैत्रीणीला खाणाखुणा करून विचारले....

ती काही सांकेतिक भाषा पारंगत नव्हती. तिने अंदाज नं. ४ खुणावले. मी बिनधास्त..... जोडी जुळवली....

चार दिवसांनी ओचा सावरत, पदर खोचत, काणे डोळे वटारत..... बाई...माझ्या अंगावर धावून आल्या....

माझा कान पिरगाळत.... पाठीला दणके घालत खेकसल्या...

"शिवाजीचा जन्म अफझलखानाच्या वधाच्या दिवशी कसा काय? हेच शिकवले होय ग मी तुम्हाला?" माझ्या अल्प बुद्दीची लक्तरे काढून, संपूर्ण शाळेत मिरवली गेली. तेव्हा पासून..... चाचणी... या शब्दांचा मी धसका घेतला आहे.

तुम्ही मारे घटक चाचणी घ्या..... आमच्या घटात काही असेल तरच ते चाचणीत उतरणार ना!

तेव्हा पासून जी चाचणी मानगुटीवर बसली... ती कायमची...

उठताना, बसताना, चालताना, खाताना, पिताना... (जाऊ दे... किती ताना... मारायच्या त्या)

या चाचण्या रूपी टाचण्या सतत टोचतच असतात.

असेच अनेक टोचे झेलत, डंख साहत... मी पदव्यांची भेंडोळी खिशात (पर्समध्ये) घातली......

मग.... वाटले... सुटले चाचण्या तून...

पण आता... नोकरी... मुलाखतीच्या कात्रीत (चाचणीत) चांगलीच अडकले... या मुलाखतींनी मला रक्तबंबाळ केले... शिक्षणाशी, पदवीशी, किंचित ही संबंध नसलेले प्रश्न... आपले कंठलंगोट (टाय) हालवत मला विचारले गेले...

उदा... तुम्ही जिना चढलात, त्याला पायऱ्या किती होत्या हो?...

या चाचण्या... ओलावत होत्या पापण्या..

संताप गिळून नोकरी पटकावली...

हुश्श... आता बहुतेक चाचण्या... संपल्या..

पण... कसचंकाय... अन पोत्यात पाय!

आता वधु परीक्षा... २० मिनिटात १०० प्रश्नांची उत्तरे... फक्त एका वाक्यात .. ती सुद्दा... नम्रतेने... शालीनकुलीनतेने.... लाजत... न लाजवता.... हसतमुखे... कुणाला न दुखावता... द्यावी ही अपेक्षा.... मुलगी.... कुठे चुकते? कशी वागते? कशी बोलते?....

अश्या जीवघेण्या चाचण्या टोचून घेत... घेत... बोहल्यावर चढले.

सूनपद... स्वामिनी पद ... आणि मातृपदाच्या चाचण्या तर... प्रसववेदनेहूनही जीवघेण्या... आयुष्य म्हणजे कसौटी जिंदगीकी बनले.

कसोट्यांचा सोटा साहत... साहत... मी घरी.... सासू... पदावर व दारी... कचेरीत

अधिकारी पदी विराजमान झाले.

प्रमोशन चा पेढा तोंडात विरघळलाही नाही तोच...

एक love letter... जोरदार माझ्या समोर आदळलं गेल.....

"पदभार संभाळायचा असेल, तर उदया पासून संगणक कोर्स... फक्त १ वर्षे. करावाच लागेल, या चाचणीत उत्तीर्ण व्हावे च लागेल नाही तर कापणी !!!"

दुसऱ्या दिवशी पासून... कंम्प्युटर क्लास....

हा ऽऽऽत मेल्यांनो !!!

काही वयाचा विचार?

अडला हरि... चाचणीचे पाय धरी!

दुसरे दिवशी पासून.... चालली... ही सावित्री... संगणक शिकायला...

पतीराजांनी ..... वेंधळेपणा करू नका.... असा बेस्ट लक दिला.

सासुबाई नी... "निदान या परीक्षेत तरी पास हो" असा प्रेमळ आशीर्वाद दिला.

सुनबाई फिसकन् हसली...

नातू म्हणाला... "आजी... पँट शर्ट घालून जा..."

तेथे मिसरूड सुद्दा न फुटलेला मुलगा गुरू रूपात बघून.... अपमान वाटला.

कर्सर फिरवताना मान व डोळे दक्षिणोत्तर फिरायला लागले की..... बोर्डशी लडू झिम्मा सुरू झाला..... मांजर बनून मी माऊस ला खेळवू लागले.

हा सर्व प्रकार बघून माझ्या प्रेमळ बाँसने माझ्या गळ्यात व्ही. आर. एस. नामक सोनसाखळी घातली. आणि गुड बाय केले......

खूप खूप वर्षांनी मी निवांत झोपले......

चला.......आता संपल्या त्या जीवघेण्या चाचण्या.....

आता.... मी परीक्षक... मी खरीखरी स्वामिनी... मी सर्वांवर हुकुमत गाजवणार.... चाचण्यांच्या चाळणीत सर्वांना घोळवून चाळण....चाळण करणार.

हाऽहाऽ.... मनात मांडे......

पण... मी निवृत्त..... मोकळी.... धट्टीकट्टी... सासू.

माझी सून.... I.T. तली आणि सकाळी उशिरा उठून.... मेकअप करून ऐटीत ऑफीस गाठणारी! रात्री उशिरा घरी आल्यावर 'GN' करून झोपणारी !!!

तिने रात्री ११ वाजता शाळा घेतली...

आई.... हा प्रोसेसर..... इतकी औंस कणिक.... इतके औंस पाणी.... घालणे..... बटण दाबणे..... टाइमर लावणे.... हं बघा.... कसा मऊ लुसलुशीत कणकेचा गोळा तयार झाला...... आता रोज काही सेंकदात तुम्ही गोळा तयार करत जा. तोवढाच विरंगुळा .....

मी मान हलवली....

दुसरे दिवशी .... मी फूड प्रोसेसर मधे..... एकदा कणिक, एकदा पाणी घालतच सुटले. कान पिरगाळत सुटले.... नक्की किती औंस तेच आठवेना.

२५ माणसांना पुरेसे सूप तयार झाले!

नातीने टाळ्या पिटल्या..............

मोलकरणीने दात विचकले!

अश्या तऱ्हेने यंत्रकसोटीत फज्जा उडाला.

सून .... माझी जिद्दी.... दुसरे दिवशी सकाळी रंगलेल्या ओष्ठचंबूतून .... वाक्बाण सुटला.

आई .... Pl. जरा वॉशिंगमशीन लावा. टाइपरायटर समजून सर्व बटणे दाबतच सुटले...

मशीनने डरकाळ्या फोडल्या....... घरघर

लागली..... आणि ... मोक्ष!!!

सूनबाई........ समक्ष....!!!

मायक्रोवेव्ह चाचणीत माझी सरशी होईल असे वाटले. कारण त्यात..... माय हा मराठमोळा शब्द आहे.

पण...... हाय रे दैवा.....

त्याची माझी व्हेव कधी जुळलीच नाही.

मग..... मी बागकाम हा धोपट मार्ग स्विकारला....

फुले, पत्री, खुडून गाणे गुणगुणत.... हार करायला बसले.

चिरंजीवांनी....... रंगीत कागद, गम, कटर....... असे सटर...... फटर सामान समोर ठेवले.

नातवाला.... कागदी फुलांचे हार..... शिकव..... हे पुस्तक.

५ सें.मी. लांब .... ३ सें.मी. रूंद कापणे.... तिरकी घडी... फिरवून... उलटणे... गणिताची परिमाणं गरगर फिरू लागली...

संतापाने... पाय आपटत... अनवधानाने खोल खड्डयात पडले.

मम तनुरूपी भोपळा खड्डयात रूतून बसला!

माझा आरडाओरडा ऐकून पतीदेव हजर....

मी ओरडले.....

“जवानी याद करो... और खिंचो मुझे।”

त्यांनी दंड ठोकून मला ओढून काढण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ.

ते म्हणाले...

“प्रिये .... तू अशीच रूतून बस. मी मिडियास पाचारण करतो.. तू आणि मी दोघेही टी.व्ही वर झळकू.”

मी घाबरले....

नको... नको... ते मला विचारतील... खड्डा किती उंची ? व्यास ? परीघ?

माती कोणत्या प्रकारची?

पाणी कसे होते? त्यात डास... किटक कोणत्या प्रकारचे होते? मलेरिया, एडिस इजिप्ती नामक डास आढळले का? कसे होते? कुठे चावले?

आणि आमचा ‘बाईट’ तुम्हाला कसा वाटला?

आता.... माझ्यात कोणत्याही चाचणीला बसण्याची शक्ती नाही....

कशी बशी मी बाहेर आले...

अन् हाय रे देवा....

माझ्या वाढदिवस... गिफ्ट म्हणून... माझ्या गळ्यात लेटेस्ट मोबाईल घातला...

धून वाजू लागली की चिमुकली नात धावत येते....

ती मला ओढत पुढे धावते... मी तिच्या मागे खेचली जाते.

व माझ्या मागे आमचा झिप्रा कुत्रा... तोंडात मोबाईल ची पुस्तिका धरून धावतो...

जणू म्हणतो.... आता हे शिक..... भू. भू... भू....

अरे चाचण्या ...... चाचण्या....

किती बाई...... जीवघेण्या!!!

- उन्नती गाडगीळ
Mob. : 8805462428
dattaunnati@gmail.com





हार्दिक शुभेच्छा !

फोन : ०२२-२८७६३७४३
मोबा. : ९१३७७५४९२९

हर्षद ऑप्टीक्स™

कॉनटेक्ट लेन्स क्लिनीक

शॉप नं. ४, प्लॉट नं - ४५, गणपती भवनम, लो. टि. नगर रोड नं. ३,
एम. जी. रोड, गोरगांव (प.), मुंबई - ४०० १०४.
शॉप नं. ४, अ. भि. गोरेगांवकर शाळेसमोर, आरे रोड,
गोरेगांव (प.), मंबई - ४०० १०४.

हार्दिक शुभेच्छा !



।। श्री ।।

वझे फूड सर्व्हिसेस

ॐ वझे यांचे

मधुरा पोळी-भाजी

(12 x 12)

स्नॅक्स व कॅटरिंग

दुकान : 29276751 • मोबाईल : 9819141138

५, गणेश मार्केट, पांडुरंग वाडी रोड, सेंट थॉमस शाळेच्या शेजारी,
गोरेगांव (पूर्व), मुंबई – 400 063.

धबधब्यांच्या प्रदेशा.... मेघालय

शेक्सपियरने जरी म्हटलं असलं की नावात काय आहे, तरी एखादया व्यक्तीचं किंवा ठिकाणाचं नाव ऐकल्यावर आपल्या मनात त्याच्याविषयी काही ना काही प्रतिमा उमटल्याशिवाय राहात नाही आणि मग प्रत्यक्ष दर्शनानंतर मनातल्या प्रतिमेचे तीनतेरा (कधी चांगल्या अर्थानं तर कधी......) वाजल्याशिवाय राहात नाही. अशीच अवस्था 'नोह का लीकाइ' धबधब्याकडे जाताना झाली होती. मुळात हा धबधबा ज्या राज्यात आहे त्या राज्यात म्हणजे मेघालयामध्ये आल्यापासून इथल्या ठिकाणांची आणि माणसांची नावे उच्चारताना जिभेला चांगलाच व्यायाम घडत होता. भारताच्या पूर्व उत्तरेला म्हणजेच ईशान्य भारतात वसलेल्या या राज्यातला आमचा मार्गदर्शक होता किर्शांक (त्याचे स्पेलिंग के वाय आर असे करायचे हे त्यानेच सांगितले) आणि या मेघालय भेटीचा नियोजनकर्ता होता डॉ. नान्गोम आओमोआ. या दोघांची नावे उच्चारतानाच आमची जी दमछाक व्हायची त्यात भर पडली ती 'नोह का लीकाइ' या धबधब्याच्या नावाने. पण पहिल्या एक दिवसातच आम्हाला कळून चुकलं होतं की इथल्या लोकांची, ठिकाणांची नावे जितकी कॉम्प्लिकेटेड आहेत तितकीच ही माणसे सरळ, साधी आणि आतिथ्यशील आहेत. त्यामुळे या धबधब्याच्या नावावर न जाता मेघालयातील हिरव्यागार डोंगरांना वळसे घालत आम्ही प्रवास सुरु केला आणि इच्छित ठिकाणी पोहोचलो. तिथे जे दृश्य दिसले ते पाहिल्यावर काही क्षण काय बोलावे तेच सुचेना. समोरच्या उंच डोंगरावरून पाण्याची एक मोठ्ठी धार अविरत कोसळत होती आणि वरून पडणाऱ्या त्या पांढऱ्या शुभ्र पाण्याचे खाली पडल्यावर निळ्याशार डोहात रूपांतर होत होते. ते दृश्य पाहिल्यावर आपसूक मनात ओळी उमटल्या 'यह कौन चित्रकार है?' आमची ती चित्र समाधी भंगली ती किर्शाकच्या आवाजाने, त्याने धबधब्याची जी लोककथा सांगितली, त्यामुळे नोह का लीकाइ या नावाचे कोडे उलगडले. त्याकथेनुसार या धबधब्याच्या वरच्या अंगाला 'का लिकाइ' नावाची एक महिला राहात होती. (खासी भाषेत महिलांना 'का' हे संबोधन लावतात) या का लिकाइचा पहिला नवरा अचानक मरण पावल्यानंतर तिने दुसरा विवाह केला. पण तिला पहिल्या नवऱ्यापासून एक लहान मुलगी होती, का लिकाइ रोज मोलमजुरीच्या कामांसाठी सकाळी उठून जायची, त्यामुळे परत आल्यावर आपल्या लहानग्या बाळाला जास्तीत जास्त वेळ दयायची. ती आपल्यापेक्षा त्या बाळाला महत्त्व देते असा समज तिच्या दुसऱ्या नवऱ्याने करून घेतला आणि तो त्या बाळाचा द्वेष करू लागला. एक दिवस का लिकाइ कामावरून दमून भागून घरी आली तर घरात कोणीच नव्हत, फक्त जेवण तयार होत. नवरा बाळाला घेऊन बाहेर गेला असेल असं समजून तिने जेवण केलं आणि जेवल्यावर पान खायला पानाचा डबा उघडला तर त्यात तिला तिच्या मुलीची करंगळी मिळाली आणि मग नवऱ्याने काय केलंय हे समजलं. तिला भयंकर धक्का बसला, दु:खाने आणि रागाने ती वेडीपिशी झाली. त्या भरातच ती घरातून धावत सुटली आणि या धबधब्याशेजारून तिने स्वत:ला कडयावरून झोकून दिलं. तेव्हा पासून याला 'नोह का लिकाइ' म्हणजे 'लिकाइची उडी' असे नाव मिळाले. ही करूण कथा ऐकल्यावर त्या धबधब्याच्या अनुपम सौंदर्याला उगाचच एक काळी किनार असल्याचा भास झाला. अकराशे पंधरा फुटांवरून कोसळणारा हा धबधबा भारतातील सर्वात उंच धबधब्यांपैकी एक मानला जातो.

मेघालय राज्याची जणू ओळख बनलेला दुसरा धबधबा म्हणजे 'एलिफंट वॉटरफॉल.' शिलॉंगजवळच असलेल्या या मुळातल्या अप्रतिम धबधब्याला आता वेगळं ग्लॅमर लाभलयं ते माननिय पंतप्रधानांच्या ट्विटमुळे. हा धबधबा पाहिल्यानंतर आपल्या पंतप्रधानानी तुम्ही जर मेघालयला भेट देणार असाल तर 'एलिफंट फॉल' पाहायलाच हवा असे ट्विट केले होते. हे ट्विट किती सार्थ आहे याची प्रचिती या धबधब्याला भेट दिल्यावर येते. आता हयाचे नावही जरा गोंधळात पाडणारे आहे. कारण नावातील हत्ती आता या धबधब्याजवळ दिसत नाही. या भूमीवर आलेल्या गोऱ्यांना या धबधब्याच्या डाव्या अंगाला एक खडक हत्ती सारखा वाटला होता, त्यावरून त्यांनी एलिफंट फॉल हे नाव दिले. पुढे १८९७ च्या भूकंपात तो खडक भंगला, त्यामुळे हत्ती गेला नी धबधबा उरला असे झाले. या धबधब्याला खासी "भाषेत का क्शैद लाइ पतेंग खोहसिव्यू" म्हणजे तीन पायऱ्यांचा धबधबा म्हणतात. खरोखरच तीन टप्पयांमध्ये हा धबधबा कोसळतो, त्यातला सर्वात शेवटचा टप्पा अतिशय मनमोहक आहे. काळ्या खडकावरून पाझरणाऱ्या पांढऱ्याशुभ्र पाण्याच्या धारा आणि भोवतीची हिरवाई यामुळे एक अनोखे निसर्गचित्र इथे तयार झालेलं पाहायला मिळतं. या धबधब्याच्या तळाशी पोहोचण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या आहेत आणि एका लहानशा पुलावरून धबधब्याचा दुसरा टप्पा ओलांडून आपण खाली पोहोचतो. मात्र सध्याच्या सेल्फी वेडामुळे धबधब्याच्या धारेसमोर सहकुटूंब सहपरिवार सेल्फी काढणाऱ्यांची इतकी गर्दी असते की फक्त धबधबा कॅमेऱ्यात बंद करायला अॅंगल शोधावाच लागतो.

नॉर्थ इस्टमधील सेव्हन सिस्टर्स या नावाने प्रसिध्द असलेल्या राज्यातील मेघालय हे राज्य भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा अस्तित्वातच नव्हतं. १९७२ साली आसाम मधील खांसी, जैतिनी आणि गारो हिल्स हा प्रदेश मिळून हे राज्य निर्माण करण्यात आले. हे राज्य आकाराने आपल्या महाराष्ट्राच्या एक दशमांश ही नाही (भारतातील राज्यात आकारमानानुसार ते वरून तेविसाव्या क्रमांकावर आहे!) पण महाराष्ट्राच्या दसपट नैसर्गिक विविधता या राज्याला लाभलेली आहे. बांगलादेशला चिकटून असलेलं हे राज्य म्हणजे भारतातील सर्वाधीक पावसाचं राज्य आहे. (वर्षाला सर्वसाधारणतः ४७० इंच पाऊस पडतो इथे) साहजिकच मेघालय म्हणजे ढगाचं निवासस्थान हे नाव तर समर्पक आहेच, पण गोऱ्या साहेबाला इथे आल्यावर आपली मायभूमी आठवली आहे त्याने 'स्कॉटलंड ऑफ द ईस्ट' हे बिरूद देऊन टाकले. खासी आणि गारो टेकड्यांच्या रांगा, सुमारे ७०% भूमीवर जंगलांचे हिरवे छत्र आणि वन्यजीवांचे कमालीचे वैविध्य यामुळे मेघालय आकाराने लहान असले तरी दोन चार दिवसात आटोपत नाही. त्यात भरपूर पावसाने जागोजागी तयार केलेले धबधबे आणि त्यांना लाभलेली लोक कथेची वलये यामुळे मेघालयाची सहल अधिकच रंगतदार होते. सोहरा म्हणजे चेरापुंजी जिल्हयातच 'डेन्थेन फॉल', 'खोह रामहा', मावस्वामी(सेव्हन सिस्टर फॉल) फॉल, कॅन्रेम फॉल हे धबधबे आहेत. शिवाय स्प्रेड इगल फॉल, स्वीट फॉल, थम फॉल, पेल्गा फॉल, क्रांग सुरी फॉल आहेतच. त्यामुले मेघालय म्हणजे धबधब्यांचा प्रदेश झाला आहे.

मेघालयच्या भेटीत आवर्जून जायलाच हवे आणि पाहायलाच हवे असे ठिकाण म्हणजे डावकी. भारत आणि बांगलादेशच्या सीमेवर असलेल्या या लहानशा गावामधून उमन्गोट नदी वाहते. या नदीवरचा पूल ब्रिटिशांनी १९३२ साली बांधलेला


आहे. या पूलावरून दिसणारा नदीचा नजारा डोळ्यांचे पारणे फेडणारा आहे. हिरव्यागार रंगाचे पाणी आणि त्यातून सहज दिसणारा नदीचा तळ यामुळे पाण्यावर होडी नसून ती जणू अधांतरी तरंगत आहे असाच भास होतो.

मेघालयाची खासियत म्हणजे लिव्हिंग रूट ब्रिज. वडाच्या कुळातील झाडांना ज्या पारंब्या फुटतात त्यांचा उपयोग करून इथे नदीवरचे पूल तयार केले जातात. या पुलावरून माणसे, गुरे इतकेच नव्हे तर हलकी वाहानेही जाऊ शकतात. चेरापुंजी आणि जवळच्या भागात असे अद्‌भुत पूल पाहायला मिळतात. शिवाय स्टॅलेग्माइटची निसर्गशिल्पे मिरवाणाऱ्या गुंफा आपल्या मनोवेधक रंगांनी नजर खिळवून ठेवणारी ऑर्किडची फुले आणि अनोखे पक्षी, इथली मुलखा वेगळी खाद्य परंपरा यासगळ्यामुळे मेघालयाची भेट अविस्मरणीय होऊन जाते. आपल्याच देशाचा हिस्सा असलेला हा नवलाईचा प्रदेश अवश्य पाहा. पर्यटनाच्या दृष्टीने पावसाळा संपल्यानंतर म्हणजे ऑक्टोबर पासून ते एप्रिल पर्यंत भेट द्यायला हरकत नाही. मेघालयाला जोडून आसाममधील गौहत्तीला भेट देणे सोपे जाते. इथला मनमोहक निसर्ग पाहिल्यावर आणि स्थानिकांचा उबदार पाहुणचार घेतल्यावर 'आपोआपा खुबलेइ' (म्हणजे खासी भाषेत आभारी आहोत) हा शब्द ओठांवर येईल.

- मकरंद जोशी
makarandvj@gmail.com

आणि आज परत लिहावसं वाटलं...

आपल्या माणसांसाठी आपणच कसे दूरचे असतो.
हे आज कळलं..... आणि आज परत लिहावसं वाटलं!!
जीवनाच्या शर्यतीत आपल्याच माणसाने आपल्याच माणसाला
हरवताना पाहिलं...... आणि आज परत लिहावसं वाटलं!!
व्यक्तिस्वातंत्र्याच्या दुष्टचक्रात माणसाने आपल्यातल्या
माणुसकीला सहज मारलं ...... आणि आज परत लिहावसं वाटल!!
बेलगाम आयुष्यातील लोकांच्या क्रूर शांततेच किंचाळणं
टिकलं...... आणि आज परत लिहावसं वाटलं!!
दगडाची मूर्ती घडवायच्या आधी, तो दगडच आहे हे जाणलं.....
..... आणि आज परत लिहावसं वाटलं!!
म्हणूनच आज परत लिहावसं वाटलं.!!



संमिश्र
- सुयोग शारंग पंडित
9527031157

"यज्ञ" साठी हार्दिक शुभेच्छा !

मंदार गद्रे : ९९२०५५६४०४

प्रकाश गद्रे : ९९२०५५६०६०



"गद्रे" टूर्स

महाराष्ट्र आणि भारतातील सुनियोजित सहलींसाठी

प्रवास करा दूर दूर - विसरु नका "गद्रे" टूर्स

विश्वासाचे माहेरघर.

द्वारा : मंदार गद्रे ए/ १०१, कल्पना दर्शन सोसा. लो. टि. नगर रोड नं. ३, म. गांधी रोड,
गोरेगांव (प.), मुंबई – ४०० १०४

वेबसाईट : www.gadretours.com

मेल : mpgadre81@gmail.com

With Best Compliments From :

Harish Enterprises

We make Cake of your Choice

monginis® THE CAKE SHOP

Go ahead. Celebrate!

19, Devraj Building, S.V.Road, Near Ratna Hotel,
Goregaon (W), Mumbai - 400 062.

Tel : 28781055 / 62363806

(OPEN ON ALL DAYS)

प्रेमा तुझा रंग कसा.... अगदि श्रावणासारखा

(एक सत्यकथा)

ट्रिंग ट्रिंग.....
बोल सुशांत
येतेस न उदया.... एकसष्टावावे वर्ष साजरे करू जुईचे! लवकरच ये, गप्पाला वेळ मिळेल मग, आणि तिला आवडते तिच गुलाबी साडी घाल हं, तीनेच दिलेली, ओके, वाट पहातो!

कुठल्याही भौतिक, प्रासंगिक वादळांना भिऊन वागणे हे ज्याच्या स्पंदनांना माहीतच नव्हते असा हा सुशांत!!

प्रेम असं दयावं...............
की घेणाऱ्याची ओंजळ अपुरी पडावी.............
मैत्री अशी असावी...........
की स्वार्थाच भान नसावं..........!!!
आयुष्य असं जगावं
की मृत्यूनेही म्हणावं...............
तू जग अजुन, मी येईन नंतर.........!!

या व. पु. यांच्या शब्दांचे मुर्तिमंत रूप धारण केलेला आमचा सुशांत!!

दुसरे दिवशी सकाळीच ६ वाजता........ त्याच्या आवडत्या मोदकासह मी हजर.........

सुशांतच तो, मोठे गोड कोलगेट हास्य, प्रचंड आपलेपणा........ ये, ग वाटच पहात होतो, बस जुई जवळ , चहा आणतो मी..........

पलंगावर शांत झोपलेल्या जुईच्या कपाळावरून हात फिरवून मी सोफ्यावर बसते तोवर सुशांत आलाच चहा घेऊन!

तु आरामात चहा घे, बघ कसे छान सजवतो तुझ्या लाडक्या मैत्रिणीला.......... असे म्हणत हसत माझी वेणी ओढली अरे म्हणून धपाटा मारेपर्यन्त स्वारी गुल!!

मी, सुशांत आणि जुई शाळेपासून एकत्र, एक अतूट मैत्रीचे बंधन!!

आयुष्यात जेव्हा कधी दु:खाची लाट यायची, अंधारी रात्र स्वप्न झाकायची, सावलीलाही भिणारी एकटेपणाची वाट दिसायची तेव्हा आम्ही एकमेकांचा घट्ट आधार व आशेचा किरण होतो!!

आनंदात उंच झुल्यावर आणि संकटात, अडचणीत तिघेही कायम जमिनीवर घट्ट पाय रोवून उभे असायचो!! त्रिवेणी संगमच होता आमचा!!

आज मी सोफ्यावर बसून जे दृश्य पाहात होते ते विहंगम होते.

जुई, माझी जिवलगसखी.........
सुशांत ने हळुवार तिचे केस मागे केले
छोट्याशा रिबन ने बांधले!
चला उठा आता... नजरेने बोलणारी तु .... आता कुठे नजर लावून बसतेस ग....
स्वत: शीच बोलणारा शांत सुशांत
बाहुलीसारखे एका क्षणात त्याने तिला उचलले...
सीधा शॉवर खाली,
हीच श्रावणाची रिमझिम समज हं...... सुशांतचे गोड स्वगत!!
पटापट दोन मिनिटात स्नान आवरून मोठया टॉवेल मध्ये गुंडाळले.
मग कोरडे करून पटकन तयार साडी गुंडाळली.
अलगद केस सावरले, पावडर फिरवली......
छोटीशी टिकली मध्यभागी........... सिंदूर भांगामध्ये.... तो हि नाजूक पणे......
हातात बांगडया, चाफाचे कानातले, पायात

पैंजण...... काय ग,...... बरोबर सजवतोय न तुझ्या लाडकीला.... मधेच मला हाक...........

स्त्रियांनाही लाजवेल असा त्याने तिचा केलेला शृंगार पाहून मी मनस्वी दाद दिली.........

"वाह, छानच रे.... आहेच आमचा सुशांत ग्रेट...."

कसेतरी आतले रूदन लपवत माझे उत्तर !!

ए वेडाबाई, आता तरी हास न,

किती गोड दिसतेस..... सुशांतचे जड, भारावलेले!

नियतीच्या क्रूर थट्टेला सडेतोड उत्तर आणि शह देण्याचे सुशांतचे सामर्थ्य मला खूप काही शिकवून गेले !!

अरे, गजरा राहिलाच,..... थांब हं, आलोच. हळूच फ्रिज कडे वळून पुसलेला ओघळलेला त्याचा अश्रू कसा सुटेल माझ्या नजरेतून!!

त्याच्या नजरेतले प्रेमाचे गंगाजल ओंजळ भरून टाकते आहे आणि मग त्याच ओंजळीत त्यांच्या प्रेमाचे हसरे गुलाबी प्रतिबिंब उमटत आहे हे जाणवले मला!!

जुई, जुईमय झाली, छान सुगंधाने परिसर फुलला!

मग तिची पातळ पेज चांदीच्या चमचा वाटीने अगदी सहजतेने त्यांनी भरवली..... एक घास चिऊचा या थाटात!

हळू हळू घर भरले आप्तस्वकीयांनी......

तिचा आवडता निशीगंध डोलत होता फ्लॉवरपॉट मधे ....

त्याने तिला बसवले, सुशांत मागुन बिलगला तिला, हळुवारपणे गाल ओढुन स्मित तयार केले...... क्लिक क्लिक....

एक सुंदर बिलगणे फ्रेमबध्द झाले!

सुशांतने भला मोठा केक, त्यावर सुंदर मोराचा पिसारा, गुलाबांनी लिहिलेल माझी प्रिय जुई...... एक सुंदर मेणबत्ती....... तिच्या समोर ठेवली!

सर्व अवतिभवति, अलगद तिचा हात हातात घेत केक कापला, "Happy birthday" च्या तालबध्द गाण्याच्या सुरात...... सारा परिसर..... प्रेमाने..... आदराने भरून गेला.......

जुन्या आठवणी सुशांत ताज्याने फुलवत होता......... स्वत:लाच हरवून बसला होता!

तिला जवळ घेऊन आईसमोर वाकला....

तेव्हा मात्र आईच्या मनाचा बांध सुटला!!

आईने कवटाळले.... अरे का हा अट्टाहास...... तुझ्या भावना....... तगमग.. काहीतरी पोहोचते का तिला...... काय मिळते तुला यातून....... काही संवेदना कि नुसत्याच वेदना!!

आई... सुशांत ने आईच्या तोंडावर बोट ठेवले....

pls. आई असे नको बोलूस ग, अनेक सुंदर क्षण दिलेत तिने मला,... माझी जुई ती.....

श्रावणात आमचे प्रेम बंधनात अडकले... तेव्हाचे तिचे शब्द अजूनही हिरवेगार आहेत बघ मनात... म्हणते कशी... सुशांत काहीही झाले तरी आपल्या आयुष्यात कायम श्रावणाचच राज्य राहील!! आज Alzheimer चा प्रखर ग्रीष्म जरी आला तरी कोसळणारा बहरणारा श्रावण मी आहे न अजून ! आज साठ वर्षे पूर्ण झाली तिला. गेली ३-४ वर्षे विस्मृतीने दोस्तीच केली बघ तिच्याशी, तिला नाही कळत पण मला तरी समजते न... तिने उधळलेला श्रावणच तिला परत करतोय आई... जेवढा जमेल तेवढा... जीवात जीव असे पर्यन्त! तु ही साथ देशील न मला!!

त्याचे अश्रू मोती बनुन बरसु लागले, त्याची घट्ट मिठी तिची असहायता कमी करायचा प्रयत्न करत होती...

मागे गाण्याचे सूर मन चलबिचल करत होते......

"सख्या रे घायाळ मी हरिणी......."

- डॉ. अपर्णा फडके

मोबा. : ९८२०१५१२९०